आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० जुलै २०२४ - बुधवार

आरक्षणाच्या मुद्द्यावरून आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ झाला. मराठ्यांना ओबीसी मध्ये आरक्षण द्यावं का, यावर विरोधी पक्षाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विधानसभेत केली. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मराठा समाजाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी आशिष शेलार यांनी केली. त्यानंतर सत्ताधारी आक्रमक राहिल्यानं आधी ५ आणि नंतर १० मिनिटांसाठी कामकाज तहकूब झालं. पुन्हा कामकाज सुरू झाल्यावरही सत्ताधारी सदस्यांचा गदारोळ कायम राहिला. विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांना बोलू दे असं आवाहन, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलं. मात्र सत्तारूढ सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज पुन्हा ४५ मिनिटांसाठी तहकूब केलं.

<><><><><>

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधक गैरहजर राहिल्याचा मुद्दा प्रवीण दरेकर यांनी विधानपरिषदेत मांडला. त्यावर दोन्ही बाजूंच्या आमदारांनी हौद्यात उतरून प्रचंड गोंधळ आणि घोषणाबाजी केली. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रयत्न करूनही गदारोळ चालूच राहिला. त्यातच मंत्री उदय सामंत यांनी सभागृहासमोर पुरवणी मागण्या मांडल्या. त्या एकमताने मंजूर झाल्याची घोषणा उपसभापतींनी केली.एकीकडे गदारोळ सुरूच राहिल्यानं विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

चालू आर्थिकवर्षासाठीच्या पुरवणी मागण्या काल विधानसभेत मंजूर झाल्या.

<><><><><>

दुधातली भेसळ रोखण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, आणि पुरेसं मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक निधी देण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिलं.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा फायदा एक लाखांहून अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांनी घेतला असल्याचं निष्पन्न झालं आहे, ज्यांनी पात्र नसतानाही याचा लाभ घेतला अशा तीस हजार तीनशे त्रेपन्न  शिधापत्रिका धारकांवर ते नोकरीला असलेल्या विभागांमार्फत कारवाई केली जाईल, अशी माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी प्रश्नोत्तराच्या तासात  दिली.

<><><><>

राज्यसरकार शेतकरी विरोधी भूमिका घेत असल्याचा आरोप आज विधानपरिषदेत विरोधी पक्ष नते अंबादास दानवे यांनी केला.

नापिकी, कर्जाचा बोजा, पीक विम्यातल्या अडचणी, शेतमालाला बाजारभाव आदी समस्यांमुळे शेतकरी त्रस्त आहे. आणि सरकार केवळ मदतीच्या घोषणा करत आहे, असं ते म्हणाले. शासनानं दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहीर करूनही अद्याप शेतकरी मदतीपासून वंचित आहेत, असं ते म्हणाले.

कांदा निर्यात धोरण दुटप्पी असून गुजरात, मध्यप्रदेश मधून बोगस बी बियाणं, खतं हे शेतकऱ्यांच जीवन संपवण्याचं काम करतं,  राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना जुमानत नाहीत, मागेल त्याला शेततळं ही योजना केवळ कागदावर राहिली आहे, असं दानवे म्हणाले.

<><><><>

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज हा शासन निर्णय जारी झाला असून, यावर्षीच्या जानेवारी महिन्यापासून ही वाढ मिळणार आहे. या निर्णयाचं राज्य राजपत्रित अधिकारी-कर्मचारी महासंघानं स्वागत केलं आहे.

<><><><>

मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांना आज सकाळी ७ वाजून १६ मिनिटांनी भूकंपाचे धक्के बसले. साडेचार रिक्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपाचा

केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात, कळमनुरी तालुक्यातल्या रामेश्वर तांडा गावात होता. भूकंपामुळे कोणतीही जीवीत अथवा वित्त हानी झाली नाही. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली आणि वाशिम इथंही भूकंपाचे धक्के जाणवले. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगावी, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

दरम्यान, भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि आपत्ती निवारण यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

**<><><><><>**

गोव्यात पेडणे इथं अतिवृष्टीमुळे बोगद्यात पाणी शिरल्यानं कोकण रेल्वे मार्गावरच्या अनेक गाड्या आज रद्द करण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून मडगावला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस, मांडवी एक्सप्रेस तसंच, मंगळुरू एक्सप्रेस या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यात कोसळणाऱ्या अति मुसळधार पावसामुळे मंडणगड बाणकोट रस्त्यावरच्या तुळशी घाटात दरड कोसळून वाहतूक ठप्प झाली आहे. मंडणगड ते अंबडवे दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रुंदीकरणासाठी डोंगर कापण्याचं काम सुरू आहे.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यात कोलाड जवळ  पुई इथं मुंबई गोवा महामार्गावर नवीन पुलाचे गर्डर टाकण्याचे काम सुरू असल्याने उद्या आणि परवा वाहतुकीसाठी दोन सत्रात मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. हे दोन दिवस कोलाड इथं  सकाळी 6 ते 8 आणि दुपारी 2 ते 4 या काळात महामार्गावरील वाहतूक बंद ठेवली जाणार असून पर्यायी मार्गाचा वापर करावा असं प्रशासनानं सांगितलं आहे.

**//<><><><><>//**